प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र,
कर्जत- ४१०२०१, जि. रायगड

जा.क.प्राकृसंकें/ एकृप/कंठेप/2166/२०२३ दिनांकः 16 NOV 2023

## जाहीर प्रसिध्दी (NOTICE)

प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत येथिल आय एफ एस मॉडेल प्रक्षेत्रावरील निव्वळ कंत्राटी पध्दतीने रब्बी २०२३-२०२४ या हंगामामध्ये लागवड केलेली पिके व इतर मॉडेल मधील कामे दि.**०१ डिसेंबर २०२३ ते ३१ जानेवारी २०२४** या कालावधीत करावयाची आहेत सदरची कामे करण्यास इच्छुक असणाऱ्या अनुभवी कंत्राटदारांनी सोबत जोडलेल्या कामासाठी आपले दरपत्रक या कार्यालयास दिनांक **३०.११.२०२३** पर्यत कार्यालयीन वेळेत सादर करावे.सोबत कामाच्या अटी व शर्ती तसेच कामाची यादी आपल्या माहितीसाठी सोबत जोडण्यात आली आहे.

सहयोगी संशोधन संचालक
प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र,
कर्जत-४१०२०१ जि.रायगड

**प्रत : प्रसिध्दीसाठी**

१.नोटीस बोर्ड, प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत, जि.रायगड.
२.मा.तहसिलदार, तहसिल कार्यालय, कर्जत, जि.रायगड.
३.मा.कार्यकारी अधिकारी, पंचायत समिती कर्जत, जि.रायगड.
४.मा.मुख्याधिकारी, कर्जत नगर परिषद कर्जत, जि.रायगड.
५.ग्रामपंचायत हलिवली, ता.कर्जत, जि.रायगड.
६.गुपग्रामपंचायत किरवली, ता.कर्जत, जि.रायगड.
७.विद्यापीठ संकेत स्थळ डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली,जि.रत्नागिरी.

प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत येथिल आय एफ एस मॉडेल प्रक्षेत्रावरील कामे ठेका पध्दतीने करावयाच्या कामाचे दरपत्रक

**दरपत्रकाचा विहीत नमुना**

दिनांक

प्रति,

सहयोगी संशोधन संचालक
प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र,
कर्जत,जि.रायगड

**विषयः–** प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत येथिल आय.एफ.एस.मॉडेल प्रक्षेत्रावर प्रायोगिक पिकांची विविध कामे ठेका पध्दतीने करण्यासाठीचे दरपत्रक

**संदर्भः**–जा.क.प्राकृसंकें/एकृप/कंठेप/ /२०२३ दि. / /२०२३

वरील संदर्भित जाहीर प्रसिध्दी पत्रान्वये प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत येथिल आय.एफ.एस.मॉडेल प्रक्षेत्रावर प्रायोगिक पिकांची विविध कामे ठेका पध्दतीने पूर्ण करण्यासाठीचे दरपत्रक खालील प्रमाणे देण्यात येत आहे.

| कामाचा तपशिल | सन २०२३–२४ हंगामासाठी ( **०१.१२.२०२३ ते ३१.०१.२०२४** ) |
|---|---|
| सोबतच्या यादीमध्ये नमुद केलेल्या कामासाठीचे दरपत्रक | रूपये.........<br>अक्षरी रूपये.................... |

दरपत्रका सोबतच्या सर्व अटी व शर्ती मान्य आहेत. तरी कृपया माझे दरपत्रक मंजूर करावे हि विनंती.

**आपला विश्वासू,**

सही ः

नांवः

पत्ता ः

## कंत्राटी कामाच्या शर्ती व अटी खालील प्रमाणे

१. प्रक्षेत्रावरील कामे संबधीत विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख विभागाच्या आवश्यकतेनुसार नेमून देतील त्याप्रमाणे करणे आवश्यक राहील.

२. कामाच्या देयकाची आदायगी महिना पुर्ण झाल्यावर केली जाईल. त्यासाठी देयक सादर करते वेळी विभाग प्रमुख/प्रक्षेत्र अधिक्षक यांचे काम वेळेत पुर्ण केल्याबाबतचा दाखला जोडणे आवश्यक आहे.

३. निविष्ठांचा पुरवठा या विभागामार्फत केला जाईल.

४. ठेकेदाराकडे स्वतःचे पॅन कार्ड बॅक खाते असणे आवश्यक आहे. तसेच ठेकेदाराने कामगारांना कामाचे वेतन व त्या अनुषंगिक रक्कम संबधीत कामगारांच्या बॅक खाती जमा करणे आवश्यक आहे.

५. ठेकेदाराने नेमलेल्या मजुरांना शासनाच्या किमान वेतन दरानुसार किमान वेतन दिले जाते असे प्रमाणित करणे आवश्यक आहे.

६. प्रक्षेत्रावरील मालमत्तेचे कामगारांकडून नुकसान झाल्यास ठेकेदारास जबाबदार धरले जाईल.

७. ठेक्यामध्ये असलेल्या मजूरा व्यतिरीक्त प्रक्षेत्रावर गरजेनुसार जादा मजूर लावणेस विहीत कार्यपध्दती आवलंबून नेमण्याचा अधिकार संबधीत विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांना राहील.

८. ठेक्यातील मजूराची किमान व कमाल वयोमर्यादा शासन निर्णयानुसार निश्चित केलेली असावी.

९. याचिका क. १५९१/२०१८ संदर्भात मा. उच्च न्यायालय मुंबई यांच्या दि. १८ एप्रिल २०१८ च्या निर्णयानुसार अंतरिम स्थगितीस अनुसरून परिच्छेद क. ५१ (ई) नुसार याचिकाकर्त्या कामगारांस ठेकेदाराने ठेक्यामध्ये सामावून घेणे आवश्यक आहे.

१०. ठेकेदारामार्फत काम करणाऱ्या कर्मचऱ्यांच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व शासनावर किंवा विद्यापीठ प्रशासनावर राहणार नाही.

११. ठेकेदार व्यक्तीस/ संस्थेस उपरोक्त अटी व शर्ती मान्य असल्याचे प्रतिज्ञापत्र सादर करावे लागेल.

१२. ठेक्यासंबधी इतर सर्व अधिकार विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुखांना /विद्यापीठ प्रशासनाला राहतील.

१३. सदरचा ठेका दि. ०१.१२.२०२३ ते ३१.०१.२०२४ या कालावधीचा आहे.

वरील शर्ती व अटी एकतर्फी नसून मला त्या मान्य आहेत.

सही :....................

नांव :....................

**प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत येथिल एकात्मिक कृषि पध्दती संशोधन प्रकल्पांतर्गत**
**आय एफ एस मॉडेल विभाग**
**दि.०१.१२.२०२३ ते ३१.०१.२०२४ या कालावधीत करावयाच्या कामांची यादी**

१. शेळी, कोंबडी संगोपन करणे गुरांना नेपिअर बाजरा गवत खाण्यास देणे. गाई धुणे, दुध काढणे व विकी करणे.

२. प्रक्षेत्रावर रब्बी हंगामात लागवड केलेल्या भेंडी,भाजीपाला वर्गीय पिकांची काढणी करणे,वेल वर्गीय पिकाची लागवड करणे,खते देणे, किटकनाशके फवारणे, काढणी करणे, प्रतवारी करून विकी करणे.

३. प्रक्षेत्रावर रब्बी हंगामात चवळी ,मुग,मका इ. पिकांची लागवड करण्यासाठी शेताची आखणी करणे, पाट, बांध घालणे,अळी तयार करणे वेल वर्गीय पिकांना माडंव करणे. बांधाची सफाई करणे.

४. गांडूळ खत व्यवस्थापन पहाणे.

५. रब्बी हंगामात लागवड केलेल्या पिकांची बेनणीची कामे करणे. फवारणी करणे,पाणी देणे, खते देणे, विकी करणे इ.

६. पशुसंवर्धन संदर्भात आयत्यावेळी उदभवणारी कामे करणे.

७. पिकांनवर किटकनाशक व बुरशीनाशक औषधांची फवारणी करणे.

८. प्रक्षेत्रावरील साफसफाईची करणे.

९. शेळी, गाई व कोंबडी शेडच्या सभोवतालील झाडे झुडपे तसेच गवत काढून परिसर स्वच्छ ठेवणे.

१०. आंबा तसेच आवळा बागेतील गवत काढून साफ सफाई करणे बागेतील झाडांच्या वाळलेल्या फांदया काढणे.

११. नेपिअर बाजरा चारा पीकामधील गवत काढणे, खते देणे, पाणी देणे तसेच दैनांदिन चारा पिकाची कापणी करून गुरांना खाण्यास देणे.

१२. प्रक्षेत्रावरील कुंपण लाकडी/सिमेंट पोल वापरून दुरूस्त करणे.

१३. प्रक्षेत्रावरील आंबा, आवळा बागेत बुरशीनाशके/ किटकनाशके फवारणी करणे.

१४. रब्बी हंगामात कडधान्ये पिकाची पेरणी करणे.

१५. प्रक्षेत्रावरील बांधाची साफसफाई करणे.

१४. आयत्यावेळी उद्भवणारी कामे करणे.

ठेकेदारची सहीः....................

ठेकेदाराचे नांवः....................